VOL- VIII | ISSUE- X | OCTOBER | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कार्यक्षेत्रातील निवडक वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थांचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा.रविंद्र गजानन चव्हाण,**
संशोधक विद्यार्थी, शारीरिक शिक्षण विभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
**डॉ. जगदीश झाडबुके,**
सहयोगी प्राध्यापक,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी.

**सारांशः**

*सदरील संशोधन हे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कार्यक्षेत्रातील निवडक वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थांचा तुलनात्मक अभ्यास या विषयाच्या संबंधित केलेले आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांची संशोधन न्यादर्श निवड करण्यात आली आहे .जनसंख्या म्हणून शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कार्यक्षेत्रातील निवडक वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थांची जिल्ह्यांची निवड करण्यात आली. सदरील संशोधनात दोन जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. दोन्ही जिल्ह्यातील वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थांची कार्यक्षमता ही तुलनात्मक अभ्यासातून तपासली आहे. सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे, तर संशोधन विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी आणि मध्यमान या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करण्यात आलेला आहे.*

**प्रस्तावनाः**

भारोत्तोलन हा एक क्रीडा प्रकार असून हा खेळ जगभरातील विविध प्रदेशात आणि विविध देशातील संघटनेमार्फत खेळवला जातो. भारोत्तोलन म्हणजे दोन्ही टोकांचा वजनदार चकत्या असलेल्या एक पाच फुट लांबीच्या मजबूत लोखंडी काडीला डोक्याच्या वरपर्यंत उचलून धरण्याची ताकद मोजणे म्हणजेच भारोत्तोलन खेळ खेळणे होय. यासच इंग्रजी भाषेत वेटलिफ्टिंग असे म्हणतात. वेटलिफ्टिंग हा खेळ उन्हाळी ऑलम्पिक स्पर्धा मध्ये १९९६ च्या आवृत्तीपासून खेळला गेला आहे. महिला व पुरुष दोन्ही खेळाडू हा खेळ खेळतात. भारोत्तोलन हा क्रीडा प्रकार वेगवेगळ्या चार गटानुसार खेळवला जातो आणि त्या गटाची विभागणी ही वयानुसार केली जाते. त्यातील गट हे खालील प्रमाणे आहेत.

- गट अ : युथ १३ ते १७ वय वर्षापर्यंत
- गट बः जुनिअर १३ ते १७ वय वर्षापर्यंत
- गट क : सिनिअर १५ वर्षापासून
- गट ड: मास्टर ३५ वर्षाच्या पुढे

असे भारोत्तोलन या खेळाचे चार गट पडतात. भारोत्तोलन हा खेळ वेटलिफ्टिंग संघटना मान्यता प्राप्त खेळ असून वेटलिफ्टिंग महासंघाची स्थापना झाल्यापासून हा खेळ ऑलंपिकमध्ये खेळला जात आहे. भारतीय खेळाडू १९५२ पासून भारोत्तोलन हा खेळ खेळत आहेत. परंतु ऑलम्पिकमध्ये सन २००० मध्ये कर्नाम मल्लेश्वरी ने ६९ वजनी गटात भारतास एक ब्रांझ पदक तसेच टोकियो २०२० ऑलम्पिकमध्ये मीराबाई चानू हिने ४९ किलोखालील वजनी गटात रौप्यपदक मिळवून दिले आहे या व्यतिरिक्त कोणीही पदकाची कमाई केली नाही. परंतु इतर स्पर्धा मध्ये भारताला पदके मिळतात, तसेच भारतामध्ये वेटलिफ्टिंग खेळा संदर्भात राष्ट्रीय स्तरावरील संस्था कार्यरत आहेत. तसेच त्या संस्था राज्यस्तरावर कार्यरत असल्याचे आढळून येते. राज्य व्यतिरिक्त विभाग आणि जिल्हा स्तरावरही संस्था कार्यरत आहेत. अशाच प्रकारचे प्रशिक्षण संस्था या शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातहि असलेल्या आढळून येतात. त्यात कोल्हापूर जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशन सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांमध्ये निवडणूक प्रशिक्षण केंद्रे उपलब्ध आहेत.

**संशोधनाची गरज:**

कोणत्याही स्तरावर प्रशिक्षण घेणारे खेळाडू हे कोणत्यातरी प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेत असतात. जिल्हास्तरावरील प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण व सोयी सुविधाही पुरवल्या जात असतात, पण त्यात नियमितता व नाविन्य दिसत नाही. भारतासारख्या देशात याबाबत पाहिजे तेवढी सूत्रबद्धता आढळून येत नाही. वेटलिफ्टिंग प्रशिक्षण देणाऱ्या वेगवेगळ्या प्रशिक्षण पद्धती अस्तित्वात आहेत. काही पारंपारिक तर काही आधुनिक स्वरूपाच्या पद्धतीचा समावेश होत असतो. तर त्या संस्था मार्फत पुरविण्यात येणाऱ्या दर्जावर त्या खेळाडूंची प्रगती आणि वैयक्तिक विकासही अवलंबून असतो. सर्व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा खेळातील आलेख उंचावण्यासाठी प्रशिक्षण संस्था मार्फत पुरविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण दर्जामध्ये ही तफावत असल्याचे दिसून येते. तर त्या प्रशिक्षण संस्थाचा दर्जा उंचावण्याची गरज विविध स्तरानुसार अत्यावश्यक आहे. म्हणून सदर विषयाची निवड संशोधकाने केलेली आढळून येते.

**संशोधनाचे महत्व:**

महाराष्ट्रातील वेट लिफ्टिंग खेळात अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यामध्ये कोल्हापूर सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. या तीन जिल्ह्यातील विविध क्रीडा प्रशिक्षण संस्थाची संख्या व खेळाडूंची संख्या सुद्धा समाधानकारक असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात अव्वल स्थानावर राहण्याची व राष्ट्रीय पातळीवरसुद्धा सिद्ध करण्याची क्षमताही येथील खेळाडूंमध्ये आहे. तर त्यातून तावून सुलाखून प्रशिक्षण देणाऱ्या संस्था ही चांगल्या प्रमाणात तयार असतात, याची प्रचिती ही येथील क्रीडा संस्था आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेते खेळाडू यामधून दिसून येते. तथापि वेटलिफ्टिंग मध्ये मुलींना यासाठी प्रचंड संधी असून सुद्धा उल्लेखनीय असाच एक किंवा त्यांच्या सहभागाची प्रमाण हे अगदी नगण्य असल्याचे दिसून येते. त्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर योग्य ती उपाययोजना करणे गरजेचे आहे .तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार खेळाडू निर्माण करण्यासाठी या प्रशिक्षण संस्थांना होत असलेल्या अडचणींचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**संशोधन उद्दिष्टे:**

1. शिवाजी विद्यापीठ स्तरावरील वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थाचा अभ्यास करणे.
2. शिवाजी विद्यापीठ स्तरावरील वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थांच्या सोयीसुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधन गृहितके:**

1. शिवाजी विद्यापीठ स्तरावर वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्था या जिल्हास्तरावर उपलब्ध आहेत.
2. शिवाजी विद्यापीठ स्तरावरील वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव जाणवतो.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

1. सदरील संशोधन हे कोल्हापूर व सांगली या दोन जिल्ह्यापुरते मर्यादित आहे.
2. सदरील संशोधन हे कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यातील प्रशिक्षण संस्था पुरते मर्यादित आहे.

**संशोधनपद्धती:**

- **वर्णनात्मक संशोधन पध्दती** - सदरील संशोधन हे वर्णनावर अवलंबून असल्याने या पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.
- **सर्वेक्षण संशोधन पद्धती**- सदरील संशोधनात सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचे साधन:- प्रश्नावली**

- सदर संशोधनासाठी
- प्रशिक्षण संस्थांच्या प्रश्नावली.
- संस्थेतील भौतिक सुविधांसाठी पडताळा सूचीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन जनसंख्या आणि न्यादर्श:**

- शिवाजी विद्यापीठातील तीन पैकी दोन जिल्ह्यांची निवड लॉटरी पद्धतीने केली आहे.
- तीन जिल्हे जनसंख्या असून दोन जिल्हे निवड ही आदर्श आहेत.
- दोन जिल्ह्यातील पाच ते पाच असे एकूण दहा प्रशिक्षकाची निवड केली गेली आहे.

**संख्याशास्त्रीय विश्लेषण:**

माहिती विश्लेषणासाठी शेकडेवारी व मध्यमानाचा वापर करण्यात आलेला आहे.

**माहिती विश्लेषण:**

**टेबल १**

**आपल्या जिल्ह्यामधील वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संदर्भात आपणास कोणकोणत्या अडचणी जाणवतात ?**

| क्र. | घटक | प्रतिसाद | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १. | अतिउच्च | २ | २०.०० % |
| २. | उच्च | ५ | ५०.०० % |
| ३. | मध्यम | २ | २०.०० % |
| ४. | निम्न | १ | १०.०० % |
| | **एकूण** | **१०** | **१००.०० %** |

**अर्थनिर्वचन:**

आपल्या जिल्ह्यामध्ये आपणास वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संदर्भात कोणकोणत्या अडचणी जाणवतात यावरून असे लक्षात येते की उच्च या घटकास प्रतिसाद देणारे ५ आहेत व त्यांची शेकडेवारी ५०.०० % आहे, अतिउच्च प्रतिसाद देणारे २ आहेत व त्यांची शेकडेवारी २०.००% टक्के आहे, मध्यम प्रतिसाद देणारे २ असून त्याची टक्केवारी २०.०० % टक्के आहे, निम्न या घटकास प्रतिसाद देणारे १ असून त्यांची टक्केवारी १०.०० % आहे.

**निष्कर्ष :-**

तक्ता क्र.१वरून असे दिसून येते की ५०.००% प्रशिक्षण संस्था मध्ये जाणवणाऱ्या अडचणीचे प्रमाण हे उच्च असल्याचे आढळून आले आहे.

**टेबल २**

**वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थामध्ये उपलब्ध भौतिक साधनाची पडताळा सूची.**

| क्र. | घटक | संस्था | एकूण घटक | उपलब्ध सुविधा | उपलब्ध नसलेल्या सुविधा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भौतिक सुविधा | २ | ३५ | १४० | २१० | ३५० |
| | शेकडेवारी | -- | -- | ४० % | ६० % | १०० % |
| | मध्यमान | -- | -- | ०.८० | १.२० | २+ |

*प्रशिक्षक × घटक संख्या = एकुण १० × ३५ = ३५०

**अर्थनिर्वचन:**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर व सांगली या दोन प्रशिक्षण संस्थेचे निरीक्षण केले असता त्यातून २ प्रशिक्षण संस्थेतील १० प्रशिक्षकाकडून ३५ घटकासंदर्भात माहिती घेण्यात आली. त्यातील घटकाचे मध्यमान हे ०.८० असल्याचे आढळून आले आहे.

**निष्कर्ष :**

तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते कि वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थामध्ये ०.८० प्रमाणात भौतिक सोयी सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे.

**संशोधन शिफारशी:**

१. जिल्हा वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थामध्ये जाणवणाऱ्या समस्या संदर्भात वेगवेगळ्या उपाययोजना शासनस्तरावर करणे अत्यंत गरजेचे आहे.
२. जिल्हा वेटलिफ्टिंग प्रशिक्षण संस्थामध्ये भौतिक सुविधांचे उच्च प्रमाण असल्याने ते अति उच्च प्रमाण करण्याचा प्रयत्न करावा.

**संदर्भसूची:**


1. **उपासनी ना. के.**(१९९६)नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.
2. **दांडेकर वा. ना.**(१९९४),शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, विद्या प्रकाशन पुणे.
३. **घोरमोडे के. यु.**(२००८)शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या प्रकाशन नागपूर.
४. **डॉ. भिताडे वी. रा.**(१९८८)शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.
५. **अष्टेकर श्याम** (२०१३)आपले आरोग्य, नशनल बुक त्रुष्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली.
६. **श्री कृष्ण शर्मा (१९९५) भारोत्तोलन WEIGHTLIFTING (फ्रेंड्स पब्लिकेशन इंडिया )**
7. Greg evertt (Sep2009) Olympic weightlifting (catalyst Athletics)
8. Kyle hunt (Illustrated edition Jan2020) Beginers guide weightlifting (Rockridge press)